# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.01.2026** **वार:गुरुवार**

1. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पार्थिव देहावर आज बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार
2. अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल राजकीय वर्तुळातून आणि जनसामान्यांमधूनही हळहळ व्यक्त
3. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज आर्थिक सर्वेक्षणाचं सादरीकरण आणि
4. वीस षटकांच्या चौथ्या सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर विजय

**अजित पवार निधन**

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी 11 वाजता बारामती इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आपल्या नेत्याचं अंतिम दर्शन घेण्यासाठी हजारो कार्यकर्ते आणि समर्थक बारामती इथं जमले आहेत. अनेक राजकीय नेत्यांनी बारामती इथं पवार कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं. अंत्यसंस्काराच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्य मंत्रीमंडळातील सदस्य, महायुतीचे नेते आणि इतर मान्यवर उपस्थित राहतील.

अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या प्रचारसभांसाठी विशेष विमानानं मुंबईहून बारामतीला जात असताना अजित पवार यांचं विमान बारामती विमानतळाजवळ काल सकाळी अपघातग्रस्त झालं. विमानात त्यांच्यासोबत असलेल्या चारही जणांचा मृत्यू झाला. यामध्ये त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी यांचा समावेश आहे.

**अजित पवार- कारकीर्दीचा आलेख**

राजकारणातील दादा आणि कामाचा माणूस अशी ख्याती असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्यात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. असं व्हायला नको होतं अशीच भावना राजकीय वर्तुळातून आणि जनसामान्यांमधूनही व्यक्त होत आहे. अजित दादांच्या राजकीय कारकीर्दीचा हा आलेख...

**साखर कारखान्याच्या संचालक मंडळापासून सुरू झालेला अजितदादांचा राजकीय प्रवास अत्यंत नाट्यमय आणि तितकाच संघर्षपूर्ण होता. शरद पवारांसारख्या मुत्सद्दी राजकारणी नेत्याच्या छत्रछायेखाली वाढत असतानाही अजितदादांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत प्रचंड लोकप्रियता मिळवली. बारामती या आपल्या विधानसभा मतदारसंघाचा चेहेरामोहराच त्यांनी बदलून टाकला. त्यांच्या कामाला समर्थकांनी आणि विरोधकांनीही सारखीच दाद दिली. सकाळी 6 वाजता कामाला सुरुवात करणाऱ्या अजितदादांनी सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिलं. लोकांची कामं करण्यासाठी सत्ता हवी असा विचार करणाऱ्या अजित पवार यांनी विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांच्या काळात राज्याचं उपमुख्यमंत्रीपद भूषवलं. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटना, महाराष्ट्र खोखो संघटना याशिवाय विविध साखर कारखाने, सहकारी संस्थांच्या माध्यमातूनही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा, कामाचा झपाटा, लोकांशी आणि प्रशासनाशीही असलेला थेट संपर्क अशी अजित पवारांची ओळख होती. अजितदादांच्या कामाबद्दल त्यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर,...*जे मी बोलतो, तेच मी करतो.. मी शब्दाचा पक्का आहे.. हा अजितदादाचा वादा आहे....***

**अजित पवार श्रद्धांजली**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक अपघाती निधनाबद्दल सर्वच स्तरांतील नेत्यांनी आणि नागरिकांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रिय मंत्रीमंडळातील मंत्र्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे कधीही भरुन न येणारं नुकसान झालं आहे. ते अत्यंत मेहनती नेते होते, सहकाराच्या माध्यमातून लोककल्याणासाठी त्यांनी केलेलं काम सदैव स्मरणात राहील असं या नेत्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अजित पवार यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला. त्यात अध्यक्षांनी नमूद केलं की, अजित पवार दहाव्या लोकसभेचे सन्माननीय सदस्य होते. सहा वेळा उपमुख्यमंत्री आणि आठ वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली होती. सार्वजनिक जीवनातील त्यांची बांधिलकी सदैव स्मरणीय राहील. यानंतर संपूर्ण सभागृहानं दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनीही अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या कुटुंबियांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हा दुःखद प्रसंग सहन करण्याचे धैर्य प्रदान करो, अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो, असं राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

अजित पवार यांच्या जाण्यानं एक दिलदार मित्र गमावल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.....

**श्री अजितदादा पवार महाराष्ट्रातले एक लोकनेते होते आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता की ज्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड मोठी आस्था होती. अजित दादा एक अतिशय संघर्षशील. अशा प्रकारचं नेतृत्व होतं. आणि सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं अशा प्रकारचं व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस हा अतिशय कठीण दिवस आहे. कारण अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. आणि ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण योगदान ते देत होते. अशा काळामध्ये त्यांचं निघून जाणं हे अविश्वसनीय आहे. मनाला चटका लावणार आहे. माझ्याकरता तर वैयक्तिक, एक दमदार आणि दिलदार अशा प्रकारचा मित्र या ठिकाणी सोडून गेलेला आहे.**

अजितदादांच्या अपघाती निधनाची बातमी अविश्वसनीय आणि धक्कादायक आहे.त्यांचं अकाली जाणं जीवाला चटका लावणारं आहे अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रद्धांजली वाहिली.....

**माझ्यापेक्षा ते राजकारणात देखील अनुभवी नेते गेल्या अनेक वर्षापासूनचा त्यांचा अनुभव वयाने देखील माझ्यापेक्षा ते मोठे होते माझे आणि अनुभवाने देखील आणि म्हणून त्यांना राज्यातल्या अनेक विषयांचा गाढा अभ्यास होता. अनेक विभाग त्यांनी हाताळले होते. त्याचा राज्याला फायदा होत होता.**

काँग्रेस नेते नाना पटोले अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करताना म्हणाले....

**अजित पवार हे खऱ्या अर्थाने एक राजकीय प्रशासकीय व्यवस्थेवरती पकड ठेवणारा एक नेता होता. महाराष्ट्राचं व्हिजन होतं त्या व्यक्तीला. मी अनेक वर्ष त्यांच्याबरोबर महाराष्ट्र विधिमंडळात काम केलेलं आहे आणि शब्दाचा पक्का असलेलं व्यक्तिमत्व आज आमच्यात नाही याचं दुःख सगळ्यांनाच या महाराष्ट्राच्या लोकांना झालेलं आहे आणि जी एक नेतृत्वाची जी महाराष्ट्रामध्ये अजित पवारांच्या नंतर पोकळी निर्माण झाली ती न भरून निघणारी असं मला वाटतंय.**

कर्तृत्ववान अजित पवार यांच्या निधनानं राज्याचं झालेलं नुकसान कधीही भरून न येणारं आहे असं सांगत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दुःख व्यक्त केलं. हा निव्वळ अपघात असून त्यात राजकारण आणू नये असं ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्याचे कणखर, कार्यक्षम आणि खमके नेतृत्व लाभलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं अकाली निधन अत्यंत दुर्दैवी आणि मनाला खोल वेदना देणारं आहे. अजितदादा आपल्यातून निघून गेले आहेत, ही गोष्ट मन अजूनही स्वीकारायला तयार नाही असं पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

अजितदादा बहुआयामी व्यक्तीमत्व होते. कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले नेते होते. राज्यातील विकास कामांच्या जडणघडणीत अजितदादांचा सिंहाचा वाटा आहे असं मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

राज्य विधीमंडळातल्या अनेक नेत्यांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

अजित पवार यांच्या निधनाचं वृत्त समजताच काल राज्यात नाशिक, बीड, पुण्यासह अनेक ठिकाणी बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या.

**संसद अभिभाषण**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज संसदेत आर्थिक सर्वेक्षण 2025-26 सादर करतील. हा दस्तऐवज मुख्य आर्थिक सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने तयार केला आहे. आर्थिक सर्वेक्षण हे देशाच्या सद्यस्थितीतील आर्थिक स्थिती आणि भविष्यातील दृष्टिकोनाचा एक सर्वसमावेशक आढावा असतो. केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी सादर केला जाईल.

तत्पूर्वी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण झालं. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय संरक्षण दलांनी दाखवलेलं शौर्य आणि पराक्रम अवघ्या जगानं पाहिला आहे. भारतावरच्या कुठल्याही प्रकारच्या दहशतवादी हल्ल्याला सडेतोड प्रत्युत्तर दिलं जाईल असा संदेश सरकारनं दिल्याचं राष्ट्रपती आपल्या अभिभाषणात म्हणाल्या.

**क्रिकेट**

20 षटकांच्या क्रिकेट मालिकेत काल विशाखापटणम् इथं चौथ्या सामन्यात भारताला न्यूझीलंडकडून 50 धावांनी पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करत न्यूझीलंडनं निर्धारित 20 षटकात सात गडी गमावून 215 धावा केल्या. या मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना रविवारी तिरुवनंतपुरम इथं होणार आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**